
दै लोकमत (२) ९/९

# मनपा मतदानासाठी ३५० यंत्र वापरणार

## वोटर व्हेरीफाईड पेपर : १२ लाखांच्या निधीस राज्य शासनाची मान्यता

नांदेड : येत्या ११ ऑक्टोबरला नांदेड - वाघाळा महानगरपालिकेची निवडणूक होत आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने राज्यात प्रथमच प्रायोगिक तत्वावर व्ही.व्ही.पी.ए.टी. (वोटर व्हेरीफाईड पेपर ऑडिट ट्रेल) या यंत्राचा वापर करण्यात येणार असून यासाठी घ्यावयाच्या ३५० यंत्रासाठी राज्य शासनाने १२ लाखांचा निधी मंजूर केला आहे.



या ट्रेलच्या माध्यमातून मतदारांना आपण केलेले मतदान त्याच उमेदवाराला गेल्याचे दिसणार आहे. उमेदवाराच्या निशाणीसमोरील बटन दाबताच व्हीव्ही पॅटवर उमेदवाराचे नाव, निशाणी येणार आहे.


फेब्रुवारी २०१७ मध्ये झालेल्या महानगरपालिकेच्या निवडणुकीनंतर काही व्यक्तींनी तसेच राजकीय पक्षांनीही इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या कार्यप्रणालीबाबत संशय व्यक्त केला होता. याबरोबरच काहींनी याबाबत न्यायालयात याचिकाही दाखल केल्या होत्या. अशा प्रकारच्या तक्रारी मागील काही वर्षांमध्ये झालेल्या निवडणुकांबाबत सातत्याने येत असल्याने सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगास यापुढील लोकसभा, विधानसभेसह इतर निवडणुकांत टप्याटप्प्याने वोटर व्हेरीफाईड पेपर ऑडिट ट्रेल यंत्रणा वापरण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार निवडणूक आयोगाच्या वतीने नांदेड-वाघाळा महापालिका निवडणुकीच्या मतदानावेळी प्रथमच या यंत्राचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यासाठी मे.इलेक्ट्रॉनिक कॉ.ऑफ इंडिया यांच्याकडून ३०० मशीन खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला असून यासाठी आवश्यक असलेल्या १२ लाखांच्या खर्चास शुक्रवारी राज्य शासनाने मान्यता दिली. सध्या यंत्रासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिला असला तरी यानंतर या यंत्राचा नियमित वापर होत असल्यास त्याकरिता होणारा खर्च संबंधित महानगरपालिकेकडून घेण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

दै संपन्न भारत (४)

# नांदेड मनपा निवडणुकीत व्हीव्हीपीएटी यंत्राचा वापर?

नांदेड - नांदेड मनपाची निवडणुकीचा बिगुल वाजला असून या निवडणुकीत राज्यत सर्वप्रथमच VVP-T(Voter Verifiabl Paper -udit Trail) यंत्राचा वापर होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या प्रतिनिधी मार्फत महानगरपालिकेत दिनांक २८



व २९ अगस्ट रोजी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या यंत्रा मुळे पारदर्शकता निर्माण होण्यासाठी यांचा चांगला उपयोग होणार आहे.

दै. लोकमत

क्र.नांवाशमनपा/निवडणूक/151 2017
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांक 07/09/2017

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2017

// जाहिर सूचना //

मा.राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र मुंबई यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूक 2017 साठी निवडणूक कार्यक्रम दिनांक 06.09.2017 रोजी घोषित केलेला असून त्यानुसार दिनांक 06.09.2017 पासून ते निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत म्हणजेच दिनांक 12.10.2017 पर्यंत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रासाठी आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे.

महाराष्ट्र मालमत्ता विरुपित करण्यास प्रतिबंध करणे अधिनियम 1995 तरतुदी अन्वये खाजगी, सार्वजनिक, शासकिय, निमशासकिय, इमारतीवर निवडणूक विषयक भितीपत्रके/बॅनर्स/पोस्टर्स/होर्डीग्स/कटआऊटस्/निवडणूक लिखाण इत्यादी विनापरवानगी प्रसिद्ध करणे ही बाब दखल पात्र गुन्हा ठरविण्यात आलेली असून ज्यात अपराध सिद्धीनंतर शिक्षेची तरतुद करण्यात आलेली आहे.

करीता याद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी, सार्वजनिक, शासकिय, निमशासकीय इमारतीवर/जागेवर विनापरवानगी लावण्यात आलेले झेंडे, पोस्टर्स, बॅनर्स, फलक व वॉलपेंटीग इत्यादी (24) तासाचे आत नष्ट करावे अथवा काढून टाकवे अन्यथा महानगरपालिके मार्फत ते नष्ट/काढून घेण्यात येऊन त्याचा खर्च संबंधीताकडून वसूल करण्यात येईल व कायदेशीर कार्यवाही केली जाईल तसेच यापुढे खाजगी, सार्वजनिक, शासकीय, निमशासकीय इमारतीवर/जागा विरुपित केल्याचे आढळून आल्यास संबधिताविरुध्द अधिनियमातील तरतुदीनुसार रितसर गुन्हा दाखल करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

दिनांक : 06/09/2017
ठिकाण : नांदेड

स्वा/-
आयुक्त तथा निवडणूक अधिकारी,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

दै पुण्यनगरी 10/9

# महाघोळात 'महाऑनलाईन'ची भर

## ■ अंतिम मतदारयादी प्रसिद्ध केली नाही ■ महापालिकेने बजावली नोटीस

नांदेड, दि. ९ : प्रारुप मतदारयादीत प्रभागातील ांची ढकलाढकली झाल्याच्या तक्रारीमुळे महाघोळाची र्चा संपते न संपताच, अंतिम मतदारयादीच्या प्रसिद्धीस दतवाढ दिल्यानंतरही शनिवारी (दि.९) जाहीर होऊ कली नाही. या गोंधळाला राज्य निवडणूक आयोगाने धिकृत केलेल्या शासनाच्या महाऑनलाईन एजन्सी ारणीभूत असल्याचे समोर आले असून निवडणूक िभागाने या एजन्सीला नोटीस बजावून खुलासा मागितला ाहे. रात्री उशिरापर्यंत मनपाच्या संकेत स्थळावर तदारयादी अपलोड करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे ूत्रांनी सांगितले.

महानगरपालिकेच्या निवडणुकीतील प्रक्रियेत ुरूवातीपासून प्रत्येक कार्यक्रमाचा मुहूर्त हुकत चालला आहे. अगोदर प्रारुप प्रभाग रचना व आरक्षण जाहीर करण्याची तारीख दोन आठवडे पुढे ढकलल्यानंतर त्यात ुटी आढळल्यामुळे आरक्षणाची सोडत दुसऱ्यांदा काढावी लागली. आक्षेप स्वीकारणे, सुनावणी घेणे व अंतिम प्रभाग रचना जाहीर करण्याचे वेळापत्रक पाळण्यात आयोगाला यश आले असले तरी, त्यापुढील प्रारुप मतदारयादीच्या

### रात्री उशिरापर्यंत मतदारयादी अपलोड करण्याचे प्रयत्न सुरु

प्रसिद्धीस तांत्रिक अडथळे निर्माण झाले. रात्रभर जागूनही मनपाच्या यंत्रणेस सर्व प्रभागांच्या तयार केलेल्या प्रारुप याद्या वेळेवर अपलोड करण्यात यश आले नाही. प्रसिद्धीच्या दिवशी रात्री उशिरा प्रारुप याद्या प्रसिद्ध झाल्या.

प्रारुप मतदारयादीवर २८ ऑगस्टपर्यंत हरकती व सूचना स्वीकारल्यानंतर ७ सप्टेंबर रोजी अंतिम मतदारयादी प्रसिद्ध केली जाणार असल्याचे मनपाने जाहीर प्रगटनाद्वारे सांगितले होते. परंतु, हे काम वेळेवर पूर्ण झाले नसल्याने आयोगाने दोन दिवसाची मुदतवाढ देऊन ९ सप्टेंबरला अंतिम मतदारयादी प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मनपा निवडणूक यंत्रणेने सर्व आक्षेपांचे निराकरण करून अंतिम मतदारयादी तयार केली. राज्य निवडणूक आयोगाने मतदारयादीच्या प्रसिद्धीपासून ती अत्यंत सहजपणे मतदारांना उपलब्ध करून देण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमाचा वापर करण्याचे काम महाऑनलाईन या शासनाचे काम करणाऱ्या एजन्सीला दिले आहे. या एजन्सीने प्रारुप मतदारयादी पूर्वीच ताब्यात घेतली असून अंतिम मतदारयादी देखील मनपाने विहित वेळेत महाऑनलाईनकडे सोपविली आहे. परंतु, या एजन्सीला शनिवारी (दि.९) दिवसभर ती प्रसिद्ध करता आली नाही.

अंतिम यादी प्रसिद्धीच्या दिवशी सकाळी ६ पासूनच इच्छुक उमेदवार व राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी महापालिकेचे संकेतस्थळ चाळण्यास सुरूवात केली. परंतु, सायंकाळी उशिरापर्यंत एकाही प्रभागाची अंतिम मतदारयादी प्रसिद्ध झाली नव्हती. त्यामुळे सर्वत्र घालमेळ सुरू झाली. अनेकांनी झोन कार्यालयात संपर्क केला असता तेथेही त्यांच्या हाती निराशा आली. झोन कार्यालयात एकमेव प्रत पाहण्यासाठी उपलब्ध होती. परंतु, त्यात मतदारांची छायाचित्रे नसल्याने ओळख ■ पान २ वर

### महाघोळात 'महा ऑनलाईन'...

पटण्यात समस्या निर्माण होऊ लागली. झोनमध्ये उपलब्ध असलेली यादी विकत मागितली असता सध्या ती देता येणार नाही, याबाबत आयोगाचे मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. अंतिम यादी मतदारांच्या छायाचित्रासह द्यायची की, छायाचित्राविना याचा निर्णय होणार असल्याने त्यानंतरच इच्छुकांना मतदारयादी विकत किंवा संकेत स्थळावर उपलब्ध होईल, असे सांगण्यात आले. येत्या १६ नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज दाखल होणार आहेत. तेव्हाही असाच काही विलंब झाला तर राजकीय पक्षांकडून मनपा प्रशासनाला टीकेचे धनी व्हावे लागणार असल्याचे चित्र दिसत आहे.